उत्तम स्थीतीत ठेवण्याची जबाबदारी तुमचेवर आहे. त्याशिवाय आणखी काही गोष्टी इमारतीच्या जागी इमारतीसाठी करणे जरूर झाल्यास अथवा स्थानिक संस्थेने सांगितल्यास त्या तुम्ही तुमच्या पदर खर्चाने करावयाचे आहे.

४) तुम्हास दिले जाणारी बांधीव फ्लॅट अथवा त्यांचे भाग तुम्ही नष्ट करावाचे नाही. त्याची जाडी क मी करावयाची नाही. अथवा त्यात बदल करावयाचे नाही. तसेच ड्रेनेजचे पाईप, प्लंबींगचे पाईप छज्जे, स्लॅब बिस्म कॉलम्स यांचे कुठल्याही प्रकारे नुकसान करावयाचे नाही. उलट पक्षी या सर्व उत्तम स्थितीत राहतील अशीच काळजी तुम्ही घेणेची आहे. त्याचप्रमाणे या गोष्टीमध्ये बदल होईल अशा रितीने वा त्याचे नुकसान होईल अशा रितीने कामे तुम्ही करावयाचे नाही.

५) इमारती करीता घेतला जाणार विमा व त्याची पॉलिसी याच्याशर्तीचा भंग होईल अथवा त्यामुळे त्या पासून मिळणारा फायदा मिळणार नाही. अथवा तुमचे वापरामुळे जो हप्ता द्यावा लागेल तो हप्ता जास्त द्यावा लागेल अशा रितीने कोणतेही कृत्य तुम्ही तुमच्या व्यक्तींनी करावयाचे नाही.

६) तुमच्या जागेतील केर, कचरा, जीने, तबकड्या, जिने, इमारती भोवती असलेली मोकळी जागा या ठिकाणी टाकावयाचा नाही अथवा त्याजागे मध्ये कोणत्याही रितीने बाधा होईल अथवा उपद्रव होईल अशा रितीने कोणतेही वर्तन तुम्ही करण्याचे नाही. तसेच सदर इमारतीकरीता बसविण्यात आलेल्या लिफ्ट करीता वेळोवेळी लागणारा मेंन्टेंन्स , तसेच त्याकामी लागणारा सर्व खर्च हा सर्व फ्लॅट धारकांनी करावयाचा आहे.

७) मागणी होताच सात दिवसांच्या आत तुमचे कडून ज्या ज्या रक्कमा इमारतीसाठी मागितल्या जातील अथवा ज्या रक्कमा अनामत म्हणून संबंधीत संस्थेमध्ये भराव्या लागतील त्या रक्कमा तुम्ही ताबडतोब द्यावयाच्या आहेत. ज्या काराणासाठी सदरहू रक्कमेची मागणी तुमच्याकडे केली असेल त्या कारणाकरिता तुम्ही ती रक्कम दिली नाही तर ती सुविधा उपभोगण्याचा अधिकार तुम्हांस राहणार नाही अथवा ती सुविधा तुम्हांस मिळणार नाही.

८) बांधीव जागेवरील येणारे सर्व टॅक्सेस, वॉटर चार्जेस विमा हप्ता इतर खर्च हा तुमचे तुम्ही करणेचा आहे. याशिवाय परिशिष्ट ४ यामध्ये ज्या मध्ये ज्या सामाईक खर्चाच्या बाबी दिलेल्या आहेत त्या सामाईक खर्चाच्या बाबींवर होणारा खर्च तुम्ही हिस्सेराशीने द्यावयाचा आहे. याप्रमाणे तुम्ही रक्कम न दिल्यास मिळणाऱ्या सुविधा बंद करण्याचा, थांबविण्याचा अधिकार आम्हांस अथवा निर्माण होणारी सोसायटी, संस्था वगैरे यांना राहिल.

९) परिशिष्ठ २ यांत वर्णन केलेली बांधीव जागा तुम्ही फक्त निवासा करीता वापरण्याची आहे.

१०) संस्थेचे होणारे नियम, पोटनियम, तसेच स्थानिक संस्था अथवा सरकारने घालून दिलेले नियम, पोट नियम यांचे पूर्णपणे पालन तुम्ही कराल, असे आश्वासन तुम्ही दिले आहे. तसेच सोसायटी, असोसिएशन अथवा कंपनी स्थापन होतांना केले जाणारे नियम, पोटनियम यांचे पालन तुम्ही कराल असे आश्वासन तुम्ही आम्हांस दिले आहे.

११) इमारती भोवतीच्या मार्जिनल स्पेसमध्ये कुठल्याही प्रकारे कच्चे अथवा पक्के बांधकाम करावयाचे